**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या प्रारंभिक जीवनाचा आढावा

**प्रणिता चहांदे**
संशोधक

**प्रा. (डॉ). विमल राठोड**
मार्गदर्शक
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू. एस कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर

---

***सारांश :***

*आशियातील महिलांचे नेतृत्वगुण दर्शविणाऱ्या 'जीएलआय इंडेक्स' मध्ये एकूण आशियातील 19 देशांतील महिलांच्या नेतृत्वाचा सहा विविध क्षेत्रांतील आढावा घेण्यात आला. या देशांमध्ये अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, ब्रुनेई, कंबोडिया, भारत, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, मालदीव, म्यानमार, नेपाळ, पाकिस्तान, फिलिपिन्स, सिंगापूर, श्रीलंका, थायलंड, तिमोरलेस्ते आणि व्हिएतनाम यांसारख्या देशांचा समावेश आहे. या देशांमधील विविध कार्यक्षेत्रांचा विचार केला गेला असला, तरी महिलांचे राजकीय नेतृत्व आणि महिलांचा आवाज हा मुद्दा मात्र त्याच्या केंद्रस्थानी आहे. सिंगापूर याबाबतीत प्रथम क्रमांकावर असून त्यानंतर थायलंड, फिलिपिन्स, व्हिएतनाम या देशांचा अनुक्रमे क्रमांक लागतो. त्याखालोखाल श्रीलंका, मालदिव, मलेशिया, भूतान यांचा क्रमांक असून भारत याबाबतीत बाराव्या क्रमांकावर आहे. याच क्रमवारीत सर्वात खालच्या पातळीवर तीन देश आहेत. ते म्हणजे पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि ब्रुनेई होत. आता हे तीन देशच का ? असा विचार केला तर लगेच लक्षात की, इस्लाम हाच या तीन देशांमधील समान धागा आहे. त्यामुळे राजकीय स्तरावर महिलांच्या नेतृत्वाचा विचार करता, हे तिन्ही देश निकषांची पूर्तता करण्यास असमर्थ ठरल्याचेच यावरुन स्पष्ट होते.*

*अफगाणिस्तानमध्ये तर सध्या तालिबानी राजवट असल्याने महिलांचे उरलेसुरले स्वातंत्र्यही हिरावले आहे. पाकिस्तानमधील राजकीय पक्षांत महिला वरकरणी दिसत असल्या तरी त्या म्हणाव्या तशा प्रमुख पदावर नाहीत किंवा केवळ राजकीय घराण्याचा वारसा लाभल्यामुळे त्या प्रसिद्धीझोतात आहेत. आता नाही म्हणायला मुस्लीमजगतात पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान बेनझिर भुट्टो यांना जरुर मिळाला. पण, भुट्टोंच्या घराणेशाहीचा प्रभाव तेव्हाही होता आणि आजही 'पीपीपी' या त्यांच्या पक्षावर कायम दिसतो. दुसरीकडे पाकिस्तानी राजकारणात, मंत्रिमंडळात महिला वरकरणी दिसत असल्या तरी निर्णयप्रक्रियेत आणि पक्षांतर्गत नेतृत्वाच्या बाबतीत त्यांचे स्थान नगण्यच म्हणावे लागेल. ब्रुनेईचे चित्रही याबाबतीत फारसे आशादायक नाही. याउलट परिस्थिती ही इतर दक्षिण आशियाई देशांमध्ये दिसून येते, ज्यांपैकी आजही काही देशांची संस्कृती ही महिलाप्रधान अथवा मातृसत्ताक आहे. शिवाय महिलांचे एकूणच कुटुंबातील स्थान भक्कम असून पर्यायाने समाजात आणि राजकारणातही महिलांचा सहभाग हा उल्लेखनीय म्हणता येईल. त्याचबरोबर या देशांमध्ये महिला अधिकारांबाबत अधिक जागरुकता निर्माण होत असून तरुण महिला कार्यकर्तींचा सहभागही उल्लेखनीय आहे. तसेच या देशांच्या यादीतील श्रीलंकेचा इथे विशेषत्वाने उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरावे. कारण, जगातील पहिली महिला पंतप्रधान होण्याचा मान हा कुणा पाश्चात्त्य किंवा इस्लामिक देशाचा नाही, तर तो श्रीलंकेचा आहे.*

*सिरिमावो भंडारनायके यांनी एकदा नव्हे, तर तब्बल तीनवेळा श्रीलंकेचे पंतप्रधानपद 60-70 च्या दशकात भूषविले. तसेच 'श्रीलंका फ्रीडम पार्टी' या पक्षाचेही त्यांनी दीर्घकाळ नेतृत्व केले होते. त्यांचे पतीही श्रीलंकेचे पंतप्रधान होते, तर मुलींनीही राजकारणात प्रवेश करुन महत्त्वाची पदे भूषविली होती. याउलट जगाला स्त्री-पुरुष समानतेचे धडे देणाऱ्या अमेरिकेच्या इतिहासात एकही महिला राष्ट्राध्यक्ष निवडून आली नसून कमला हॅरिस या निवडून आलेल्या पहिल्या महिला उपराष्ट्राध्यक्ष म्हणून सध्या कामकाज पाहत आहेत. तेव्हा पाश्चिमात्त्य देश असो अथवा इस्लामिक देश, आशियाई देशांना स्त्री-पुरुष समानता, महिलांचे अधिकार, नेतृत्वक्षमता यावरुन सल्ला-उपदेश करण्यापेक्षा आपल्या घरात एकदा तरी त्यांनी नक्की झाकून बघावे, चित्र आपसुकच स्पष्ट होईल!*

**शब्दकुंज** : प्रतितिधित्व, अग्रेसर, सल्ला-उपदेश , प्रचंड , सवोच्च, नेतृत्वक्षमता, उत्कृष्

---

**प्रस्तावना :**

2007 ते 2017 या काळात प्रतिभाताई पाटील यांनी देशातील सर्वोच्च पदावर प्रथम महिला राष्ट्रपती म्हणून देशाचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या पूर्वी राष्ट्रपती पदावर "मिसाइल मैन" एपीजे अब्दुल कलाम विराजमान होते. वास्तविक अब्दुल कलाम साहेबांनी आपल्या दुसऱ्या राष्ट्रपती कार्यकाळाला घेऊन अनिच्छा व्यक्त केली होती, त्यामुळे युपीए तर्फे राष्ट्रपती पदाकरता प्रतिभाताई पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवण्यात आला. या राष्ट्रपती निवडणुकीत प्रतिभाताईंनी आपले प्रतिद्वंदी भैरोसिंह शेखावत यांना 3 लाखांहून अधिक मतांनी हरविले. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीवेळी भैरोसिंह शेखावतांना राष्ट्रीय जनतांत्रिक संयुक्तपक्षाचे (एनडीए) चे समर्थन मिळाले तर शिवसेना (एनडीए चा मित्रपक्ष असून देखील) संस्थापक बाळासाहेब ठाकरेंनी प्रतिभाताई या मुळात मराठी असल्याच्या मुद्य्यावरून त्यांना समर्थन द्यायचे ठरविले.

प्रतिभाताईंनी स्वतःला केवळ राजकीय भूमिकेतून समाजासमोर ठेवलं असं नव्हे तर त्या सतत सामाजिक बांधिलकी जपत समाजकार्यात देखील अग्रेसर होत्या. देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी महिलांकरता महिला होम गार्डची स्थापना केली. गरीब आणि होतकरू महिलांसाठी संगीत, संगणक, शिवणकामाचे प्रशिक्षण केंद्र देखील सुरु केले. ताईंनी मुंबई दिल्ली येथे आपल्या घरापासून दूर राहणाऱ्या वर्किंग वूमंस करता वसतिगृह उभारले. आपल्या प्रत्येक जवाबदारीला समर्थपणे पूर्णत्वास नेणाऱ्या ताईंनी शिक्षणावर भर देत गरीब आणि मागासलेल्या वर्गातील मुलांसाठी नर्सरी स्कूल ची स्थापना केली. प्रतिभाताईंनी जळगावला अनुसूचित जनजातीतील युवकांसाठी इंजिनियरिंग कॉलेज सुरु केले. अमरावतीत ताईंनी दृष्टीहिनां करता 'औद्योगिक प्रशिक्षण संस्था' स्थापन केली. श्रमसाधना ट्रस्ट च्या कार्यकारी ट्रस्टी म्हणून देखील ताईंनी अनेक महत्वपूर्ण कामं केलीत. जळगाव साखर कारखान्याच्या अध्यक्ष म्हणून सुधारणेची अनेक कार्य ताईंनी केलीत. 'महिला विकास मंडळ' स्थापन करण्यात देखील त्यांचे मोठे योगदान आहे. दृष्टीहीन व्यक्तीसाठी ओद्योगिक प्रशिक्षण विद्यालय जळगांव येथे सुरु केले. देशाच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटलांनी जळगावला 'महिला कॉ.ऑपरेटीव्ह बँकेची' स्थापना केली. शेतकऱ्यांसाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्याकरता आणि शेतकऱ्यांना शिकवण्यासाठी अमरावतीत ताईंनी "कृषी विज्ञान केंद" स्थापन केले. देशाच्या सर्वोच्च पदावर पहिली महिला राष्ट्रपती म्हणून विराजमान होऊन प्रतिभाताई पाटील यांनी केवळ इतिहासच रचला असे नाही, तर

महिलांच्या सशक्तीकरणाचं त्या एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

**व्यक्तिगत परिचय :**

**जन्म :**

प्रतिभाताई पाटील यांचा जन्म १९ डिसेंबर १९३४ रोजी जळगावमध्ये झाला. भारतीय प्रजासत्ताकाच्या बाराव्या आणि भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती. इंग्रजी, हिंदी आणि मराठी या तिन्ही भाषांवर प्रभुत्व असलेल्या अभ्यासू वक्त्या, वकील, सामाजिक कार्यकर्त्या, कुशल संघटक, प्रभावी प्रशासक, कुटुंबवत्सल गृहिणी असे एक विविधांगी प्रगल्भ व्यक्तिमत्व. त्यांचा जन्म जळगाव, खानदेश येथील एका सुसंस्कृत आणि श्रीमंत कुटुंबात झाला. वडील नारायणराव उपाख्य नानासाहेब पाटील हे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ. आई राजकुँवर या गृहिणी. प्रतिभाताई पाच भावांची एकुलती एक लाडकी बहीण. त्यांचे बरेचसे बालपण बोदवड तालुक्यातील नाडगाव या लहानशा खेडेगावी झाले. त्यांचे शालेय शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व महाविद्यालयीन शिक्षण जळगाव येथील मूळजी जेठा महाविद्यालयात झाले.

अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी सन 1962 मध्ये पुणे विद्यापीठाची एम. ए. ही पदवी संपादन केली. महाविद्यालयीन जीवनात त्यांनी अनेक आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत विजेतेपद मिळविले आणि महाविद्यालयाचा 'ब्युटी क्वीन' हा किताबही त्यांनी पटकावला आहे. ताईंनी एकदा चाळीसगाव येथील क्षत्रिय महासभेच्या महिला मेळाव्यामध्ये अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यावेळी कार्यक्रमाला उपस्थित तत्कालीन आमदार सोनूसिंह अण्णा पाटील व भानुप्रतापसिंह हे दोघेही अत्यंत प्रभावित झाले. तेव्हा त्यांना राजकारणात प्रवेश करण्याचा आग्रह करण्यात आला. पुढे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ताईंना जळगाव विधानसभा मतदार संघातून काँग्रेसची उमेदवारी दिली. त्या 1962 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत प्रचंड मताधिक्यांनी निवडून आल्या. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी त्या पहिल्यांदा आमदार झाल्या. आमदार असतानाच त्यांनी मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि 1965 मध्ये तेथून एलएल.बी ही पदवी संपादन केली. त्यानंतर न्यायालयात त्यांनी एक खटला दाखल केला व त्यात विजय संपादन केला. त्याच कालावधीत त्यांची एस.टी. महामंडळाच्या अध्यक्षपदावर निवड करण्यात आली. पुढे त्यांचा विवाह अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. देवीसिंह शेखावत यांच्याशी 7 जुलै 1965 रोजी झाला. त्यांना राजेंद्र उपाख्य रावसाहेब हा पुत्र व ज्योती राठौर ही कन्या अशी दोन अपत्ये आहेत. त्यांनी 1962, 1967, 1972, 1978 आणि 1980 अशा एकूण पाच वेळा विधानसभा निवडणुकीत विजय मिळविला. त्यांनी 1967 ते 1978 आणि 1982 ते 1985 या काळात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात सार्वजनिक आरोग्य, पर्यटन, दारुबंदी, संसदीय कार्य, समाजकल्याण, गृहनिर्माण, नगरविकास, शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री अशा विविध विभागाच्या मंत्री म्हणून कार्यभार सांभाळला.

या कालावधीत त्या काँग्रेस पक्षाच्या विरोधी पक्षनेत्या होत्या. त्या 1986-88 मध्ये राज्यसभेच्या उपसभापती व 1988-90 मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा होत्या. 1991 मध्ये त्यांनी अमरावती लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून विजयी निवडणूक लढवून 1996 पर्यंत अमरावती मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी अनेक देशांचे यशस्वी दौरेही केले आहेत. त्यानंतर मात्र 1997-2004 या कालावधीत त्या

आपल्या कुटुंबात आणि सामाजिक कार्यात रममाण झाल्या. त्यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षकार्यात दिलेले त्यांचे योगदान मोठे आहे. म्हणूनच त्यांची राजस्थानच्या राज्यपालपदी निवड झाली. त्यांनी 8 नोव्हेंबर 2004 रोजी राजस्थानच्या पहिल्या महिला राज्यपाल म्हणून शपथ घेतली. या सर्व पदांवरुन त्यांनी राज्याच्या आणि जनतेच्या हितासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, तसेच ते अंमलातही आणेल. 21 जून 2007 पर्यंत त्यांनी ही वाटचाल यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्वाचा वयाच्या 73 व्या वर्षी घटनात्मकदृष्ट्या सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान झाला आणि 25 जुलै 2007 रोजी त्यांचा भारतीय प्रजासत्ताकाच्या बाराव्या व भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून शपथविधी झाला. त्यांचा हा गौरव म्हणजे महाराष्ट्र कन्येचा सन्मानच होय.

**लहानपण:**

प्रतिभा पाटील यांच्या आईचे नाव गंगाबाई आणि वडिलांचे नाव नानासाहेब उर्फ नारायणराव होते. नानासाहेब हे जळगाव येथे सरकारी वकील होते. त्यांना पांच मुले व एक मुलगी होती. प्रतिभा यांचे बालपण जळगाव आणि चाळीसगाव येथे झाले. सुट्टीच्या काळात त्या आपल्या आजोळी नाडगांव येथेही जात असत त्यांच्या वयाच्या 10 व्या वर्षीच त्यांच्या आईचा स्वर्गवास झाला. त्यानंतर त्यांची देखभाल त्यांच्या सर्व भावंडांची मावशी बासाहेब यांच्या निगराणीखाली झाली. बासाहेब यांनी सर्व चालीरीती विशेष करून त्यांचेवर योग्य संस्कार केले आणि परंपरा यांचे पालन उत्तम प्रकारे मुलांकडून व्हायला हवे यावर भर दिला. त्याचा उत्तम परिणाम प्रतिभा यांच्यावर झाला. कणखर इच्छाशक्ति, नात्यांतील आपुलकी, व्यवहारांतील वैचारिक शिस्त त्यामुळे बाणविली गेली. एकदा 8-9 वर्षांच्या असतांना त्या व त्यांची मैत्रीण कक्कू शाळेत बरोबर जात असतांना पाऊस येत होता पण खूपच जोरात पाऊस आला व एक नाला पार करीत असतांना त्यांचे दोघीचे पाय जमिनीवरून सुटले व त्या दोघी वाहवत निघाल्या परंतु एक माणूस कोणीतरी आला व त्याने त्या दोघींना बाहेर काढले त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

**शिक्षण:**

नानासाहेबांनी आपल्या मुलीला भरपूर शिक्षण देण्याचे वचन आपल्या पत्नीला दिले होते. त्यांनी तो शब्द कटाक्षाने पाळला.  त्यांचं बालपण हे जळगाव आणि जवळच असलेल्या चाळीसगाव येथे गेले. पुढे प्रतिभाताईंनी आपले शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण हे जळगावमधूनच पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनात त्या उत्कृष्ट टेबल टेनिसपटू (Pratibha Patil Table Tanis Player ) होत्या. त्यांनी युनिव्हर्सिटी स्पर्धांमध्ये अनेक बक्षीसे जिंकली होती. एम. जे. महाविद्यालयात शिकत असताना त्यांना 'कॉलेज क्वीन'चा खिताबही मिळाला होता. त्यांनी राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले. पुढे एलएलबी केल्यानंतर प्रतिभाताईंनी वकिलीस प्रारंभ केला. त्याच काळात महिलांच्या सामाजिक प्रश्नांमध्ये त्या लक्ष घालू लागल्या आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला नवी कलाटणी मिळाली.1962 साली महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या आमदार असतांना त्यांनी आपल्या पित्याच्या इच्छेखातर कायद्याची पदवी घेतली. त्याचा पुढे त्यांना त्यांच्या कार्यात फार फायदा झाला. त्यांच्या या व्यापक शैक्षणिक अनुभवांमुळे त्यांना राज्य स्तरांवर अनेक विभागांचे मंत्रीपदही मिळाले. सतत वीस वर्षे त्यांनी निरनिराळ्या विभागाचे मंत्रीपद, तसेच केंद्रीय पातळीवरही अनेक घटनात्मक पदे भुषविली.महाविद्यालयातील आपले शिक्षण पूर्ण करत असताना खेळातही रस घेतला. विशेष म्हणजे त्यांनी टेबल-टेनिसमध्ये इंटर कॉलेजिएट स्पर्धामधे विजेतपद

मिळविले होते.प्रतिभाने आपले पहिले भाषण चाळीसगांव येथील राजपुत समाजाच्या मेळाव्याप्रसंगी केल. समाजातील ज्येष्ठ व्यक्ती त्यांच्या विचाराने प्रभावित झाल्या. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. उच्च शिक्षित तरुणींनी आपल्या ज्ञानाचा लाभ राजकारणात प्रवेश करून घ्यावा असे आपले धोरण असल्याचे मा. चव्हाण यांनी नमूद केले. त्यानुसार उच्च विद्या-विभूषित आणि उत्तम संवाद कौशल्य असणाऱ्या प्रतिभा पाटील यांना जळगाव मतदारसंघातून येथून 1962 साली विधानसभेच्या निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाने तिकीट दिले. राजकारणातील त्यांच्या या पदार्पणाच्या निवडणुकीत त्यांनी आपल्या तीन ज्येष्ठ आणि जाणत्या अनुभवी विरोधकांचा पराभव केला. 1962 ते 1985 या कालावधीत त्यांनी पाच वेळा विधानसभेच्या निवडणुका जिंकल्या. 1985 साली राज्यसभेचे सदस्यत्व. निवडणुकीत त्या कधी हरल्या नाहीत.

**कौटुंबिक जीवन :**

सन 7 july 1965 मध्ये प्रतिभाताईंचा अमरावती येथील शिक्षणतज्ज्ञ डॉ. देविसिंग शेखावत यांच्याशी विवाह झाला रसायनशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या डॉ. देवीसिंह रामसिंह शेखावत यांच्याशी विवाह झाला. डॉ. शेखावत यांनी मुंबई येथील नामांकित हाफकिन संस्थेतून केमोथेरपी सारख्या विषयात (रसायनशास्त्रातील) संशोधन करून पीएच. डी. पदवी प्राप्त केली. एक शिक्षणतज्ञ व सामाजिक कार्यकर्ता असणारे डॉ. शेखावत अमरावती महानगरपालिकेचे पहिले महापौर बनले तसेच ते अमरावती विधानसभा मतदार संघातून निवडून आले व आमदार देखील झाले. श्रीमती प्रतिभाताई – डॉ शेखावत यांना दोन अपत्ये असून – मुलगी श्रीमती ज्योती राठोर आणि मुलगा श्री राजेंद्रसिंह आहेत. सामाजिक आणि राजकीय कार्यात त्यांना रस होता. 1985 त 1990 या काळात ते अमरावती मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधीत्व केले होते. 1992 साली नव्याने स्थापन झालेल्या अमरावती महानगरपालिकेच्या प्रथम महापौरपदाचा बहुमानही त्यांना मिळाला. शैक्षणिक क्षेत्रातीलही त्यांची कामगिरी भरीव आहे. नागपूर विद्यापीठात – सिनेटचे सभासद होते, स्पोर्ट कमिटी चेअरमन असतांना – शिवाजी पुरस्कार शासनातर्फे मिळाला. अमरावती विद्यापीठाच्या सिनेटचे सभासद होते आणि काही काळ विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु म्हणूनही काम केले. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक समितीचे सभासद म्हणून काम करताना त्यांनी रसायनशास्त्र विषयाचा अभ्यास क्रम तयार केला. त्याचबरोबर त्यांनी या विषयांवर तज्ञ म्हणून माध्यमिक शालेय स्तरांवरची पुस्तकेही आपल्या सहकाऱ्यासमवेत लिहिली. त्यांनी आपल्या पत्नीला तिच्या राजकीय प्रवासात भक्कम साथ दिली. त्यांना दोन मुले आहेत. त्यापैकी राजेंद्र (रावसाहेब) यांनी आपल्या माता-पित्यांच्या पाऊलावर पाऊल टाकले आहे. ते आमदार होते. कन्या ज्योती या अभियांत्रिकी पदवीधर आहेत, पुणे येथे एक नामांकित शाळा चालवितात.

**सामाजिक कार्य :**

प्रतिभाताई पाटील यांनी समाजकार्यापासून आपल्या कार्यकिर्दीला सुरवात केली. त्यानंतर त्या राजकरणात आल्या. प्रतिभाताईंना विधानसभेत अनेक पदांवर संधी मिळाली. त्यांचे त्यांनी सोने केले. 1967 ते 77 या कालावधीत उपमंत्री, राज्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्रीपद सांभाळले. त्यानंतर 1978 ते 1980 या कालावधीत शरद पवार पुलोदचे मुख्यमंत्री असताना त्यांनी विरोधी पक्षनेतेपद समर्थपणे सांभाळले. शरद पवारांसारखा नेता समोर असताना विरोधी पक्षनेतेपदी प्रतिभा पाटील असणे खरे तर यातच त्यांची क्षमता दिसून

येते. कारण त्यांच्यावर पक्षाचा विश्वासही तगडा होता. ताई आपल्या राजकीय कारकिर्दीत कोणतीही निवडणूक हरल्या नाहीत. जळगावच्या आमदार म्हणून सन 1962 मध्ये त्या पहिल्यादा निवडून आल्या. त्यानंतर 1967 ते 1985 पर्यंत मुक्ताईनगरच्या आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. त्यानंतर 1985 ते 1990 राज्यसभा सदस्य व राज्यसभेच्या उपाध्यक्षा होत्या. ताईंची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे माहेरी जळगाव जिल्ह्यात त्या यशस्वी राहिल्याच तर नंतरच्या काळात त्या सासरच्या अमरावती लोकसभा मतदार संघातूनही निवडून गेल्या. याचाच अर्थ असा की, त्यांनी निवडणूक लढविली आणि त्या पराभूत झाल्या असे कधीच घडले नाही. 1985 ते 1990 पर्यंत त्यांनी राज्यसभेच्या सदस्या म्हणून काम पाहिलं. तसेच 2004 मध्ये त्यांची राजस्थानच्या 24 व्या राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**राजकीय कार्य :**

25 जुलै 2007 मध्ये त्या राष्ट्रपतीपदी निवडून आल्या. सर्वाधिक परदेशी दौरे करणाऱ्या आणि परदेशी दौऱ्यांवर सर्वाधिक खर्च झालेल्या राष्ट्रपती म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते. राष्ट्रपती म्हणून त्यांनी महिला आणि बाल विकासावर अधिक भर दिला होता. राष्ट्रपतिपदाची कर्तव्ये पार पाडतानाच त्यांनी वायुसेनेच्या सुखोई, टी-१० या रणगाड्यावर स्वार होऊन, सुदर्शन शक्ती सैन्य अभ्यास दौ-यात सहभागी होऊन ताईंनी महिला शक्तीची प्रचिती आणून दिली होती. राष्ट्रपतीपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांनी स्वत:ला सामाजिक कार्यात झोकून दिले आहे. त्यांनी पती देवीसिंह रणसिंह शेखावत यांच्यासोबत विद्या भारती शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली असून त्या अंतर्गत अमरावती, जळगाव आणि मुंबईत शाळा- महाविद्यालये स्थापन केली आहेत. त्यांनी श्रम साधना ट्रस्टचीही स्थापना केली आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून नोकरदार महिलांसाठी नवी दिल्ली, मुंबई आणि पुण्यात वसतीगृहांची स्थापना करण्यात आली आहे. ताईंनी आपल्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत आमदार, मंत्री, विरोधी पक्ष नेता, राज्यसभेच्या उपाध्यक्षा, राज्यपाल आणि जगाच्या सर्वात मोठ्या लोकशाहीच्या राष्ट्रपती, सुखोई विमानामध्ये उड्डाण भरणारी विश्वाची पहिली महिला, असा त्यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. विविध पदांची जबाबदारी सांभाळताना प्रतिभाताईनी आपल्या कर्तृत्वांचा अमीट ठसा भारतीय राजकारणावर उमटविला आहे. संवेदनशील, शालीन स्वभावाच्या, पारदर्शी व्यक्तित्व असलेल्या, भारतीय पारंपरिक, आदर्श स्त्री, कपाळावर ठसठशीत कुंकू, आणि डोक्यावर पदर, इंग्रजी, हिंदी आणि मराठी या तिन्ही भाषांवर प्रभुत्व असलेल्या अभ्यासू वक्त्या, वकील, सामाजिक कार्यकर्त्या, कुशल संघटक, प्रभावी प्रशासक, कुटुंबवत्सल गृहिणी असे एक विविधांगी प्रगल्भ व्यक्तिमत्व, तसेच राजकारणात राहूनही साधनशुचिता जपलेली जी काही थोडी व्यक्तिमत्वे आहेत, त्यात प्रतिभाताईंचे नाव घेतले जाते. खरं पाहिलं तर, ताईंच्या संपुर्ण राजकीय वाटचालीत अहंकार किंवा बडेजाव कधीही दिसून आलेला नाही.

**निष्कर्ष :**

प्रतिभा पाटील यांच्या रूपाने प्रथमच एक मराठी महिला देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाली ही घटना तमाम महाराष्ट्राला अभिमान वाटावी अशी आहे. कमी वयात राजकारणात आपला यशस्वी ठसा उमटवत आमदारकीपासून ते थेट देशाच्या राष्ट्रपतीपदापर्यंत विविध पदे भूषविली तरीही आपला साधेपणा आणि

सुसंस्कृतपणा कायम जोपासला. ताईंच्या जीवनप्रवासावर आजपर्यंत 15 पुस्तके लिहिण्यात आली आहेत. देशात आज तागायत एकच महिला प्रधानमंत्री झालेली आहे. परंतु अनेक महिला राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री पदावर आरूढ झालेल्या आहेत. असे असूनही देशाच्या सर्वोच्च पदावर आरूढ होण्याचा मान महाराष्ट्राच्या कन्येला मिळाला ही अभिमानास्पद बाब आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- राष्ट्रपती प्रतिभा पाटील : वैयक्तिक व राजकीय जीवन प्रवासाचा मागोवा – डॉ. छाया महाजन
- राजस्थानच्या इतिहासातील पहिल्या महिला राज्यपाल ‘भारत के पूर्व राष्ट्रपती’ २६ नोव्हे. २०१३.
- आजतक – Archived from the original on 23 jun 2012.
- प्रतिभा पाटील : यांनी रचला होता इतिहास, गिफ्ट घेऊन जाण्याबद्दल झाला होता विवाद – परिक मोहित, (१९ डिसेंबर २०१७)
- Aajtak India Today news website. Archived from the original on – 8-12-2019.
- ‘प्रतिभा पाटील चा परिवार बरोबर दौरा सामान्य प्रक्रिया विदेश मंत्रालय’, NDTV इंडिया, ३ मे २०१२.
- https://maharashtratimes.com/photogallery/politics/happy-brithday-pratibha-patil/amp_photoshow/67156648.cms
- Biographical Sketch Member of Parliament X Lok Sabha
- https://www.lokmat.com/maharashtra/former-president-pratibha-patil-lokmat-life-gaurav-award/
- *ब्युरो, आजतक. "प्रतिभा पाटील ने ३५ गुन्हेगारांची फाशी दंड उम्रकैद मध्ये परिवर्तित केला".*
- *आजतक. Archived from the original on २३ जून २०१२. ०८-१२-२०१९ रोजी पाहिले.* ॲक्सेसदिनांक= मधील दिनांक मूल्ये तपासा (सहाय्य)
- *परिक, मोहित (१९ डिसेंबर २०१७.). "प्रतीभा पाटिल : यांनी रचला होता इतिहास , गिफ्ट घेऊन जाण्या बद्दल झाला होता विवाद".*